Suresh Pandurang Suryawanshi
B.E. (Civil)



**RUSHIKESH**
**CONSTRUCTION**
**ENGINEER & CONTRACTOR**

Joshi Lane, TASGAON
Tal.Tasgoan, Dist.Sangli
Ph.:(02346) 241101
Mob.: 9766192070

बुक-पोस्ट

प्रति,
कचे शिवराज नारायण
लातूर.

प्रेषक :
प्रा. (डॉ.) शिवकुमार सोनाळकर,
संपादक तथा अध्यक्ष
शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर
द्वारा : अनुराज, ७/ब सूर्यवंशी कॉलनी, सानेगुरुजी वसाहत, कोल्हापूर - ४१६ ०११

आव्हान आजच्या तमाशा मंडळासमोर आहे. आजही समाजातील उच्चवर्णीय समाज, स्त्रीया तमाशाविषयी नाक मुरडताना दिसून येतात. या मनोवृत्तीत बदल घडवून आणण्यासाठी तमाशाने नविन कांहीतरी करण्याची गरज आहे. एवढेच नाही तर नवतरुण कलावंत तमाशाकडे पाठ फिरवताना दिसतो. म्हणजेच कलाकारांचा अभाव, तसेच त्यांच्या आरोग्याचे प्रश्न, कलावंतांना समाजात मिळणारी हिन वागणूक, वृद्धावस्थेतील हलाखीचे जगणे अशी कितीतरी आव्हाने आज तमाशा लोककलेसमोर उभी राहिलेली दिसतात. या आव्हानांचा सामना करून तमाशा मंडळासमोरील समस्या / आव्हाने दुर करण्यासाठी शासनाबरोबरच समाजानेही मोठा हातभार लावण्याची गरज आहे. तरच ही लोककला टिकून राहील. अन्यथा तमाशा ही एक लोककला होती हे फक्त लोकसाहित्याच्या पुस्तकात भावी पिढ्यांना वाचावे लागेल.

**सारांश :**

महाराष्ट्राची एक वेगळी ओळख निर्माण करून देणारा कलाप्रकार म्हणून 'तमाशा'कडे पाहिले जाते. या कलाप्रकाराने कालौघात घडवून आणलेला बदल हा मुळ तमाशा कला प्रकाराला बाधक ठरतो आहे. त्यात असलेला अस्सलपण कुठेतरी हरवत चालला आहे. यावर 'तमाशा' कलावंतांनी विचारमंथन करण्याची गरज आहे. काळानुरूप मनोरंजनाची साधने बदलली आहेत. त्यास तोडीस तोड देण्यासाठी तमाशातील अस्सलपणा टिकवून मराठी मनाचे मनोरंजन करण्याची गरज आहे. यासाठी वेगळा प्रयत्न नक्कीच करावा लागेल.

**संदर्भग्रंथ :**


१) 'मराठीचे लोकनाट्य तमाशा कला आणि साहित्य', नामदेव व्हटकर, अजब पब्लिकेशन्स, भवानी मंडप, कोल्हापूर, डिसेंबर २००९.

२) 'तमाशाची पंढरी', प्रा.डॉ. भरत देशमुख, मैत्री प्रकाशन, सिद्धेश्वर रोड, लातूर, मार्च २०१२.

३) 'लोककला : साहित्य व समाज', संपा. प्रा.डॉ. मुंजा बाबुराव धोंडगे, न्यु मॅन पब्लिकेशन्स, १०८, ब्रह्मा अपार्टमेंट्स, दत्तधाम जवळ, परभणी, प्र.आ. २०१६.

४) 'लोकरंगभूमी' प्रभाकर मांडे, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ. १९९४.

५) 'पारंपरिक मराठी तमाशा आणि आधुनिक वगनाट्य', विश्वनाथ शिंदे, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९९८.

झाला. एवढ्यावरच न थांबता ती सुटाबुटात तमाशा रंगभूमीवर वावरण्यात स्वतःला धन्य समजू लागली. त्यामुळे नाचीच्या नाचातील मुळचा ठसका हरवला. सध्या नुसता चंगळवादच दिसून येतो आहे. केवळ चित्रपटगीते आणि रिमिक्स याचाच भरणा अधिक जाणवतो.

आज मात्र चित्रपटांचा तमाशावर प्रभाव दिसून येतो. चित्रपटातील गाणी, संगीत, वेशभूषा, प्रकाश योजना याचे अनुकरण तमाशातून होताना दिसते. पूर्वीच्या पेहरावात आणि साजशृंगारात दिसणाऱ्या नृत्यांगना आज तोकड्या कपड्यांमध्ये उत्तान हावभावासह आधुनिक रिमिक्स गाण्यावर थिरकताना दिसतात. यामुळेच मराठमोळी तमाशाचा आज आर्केस्ट्रा झालेला दिसून येतो. यामुळेच तमाशाचे पारंपरिक स्वरूप हरवत चालले आहे. तमाशाच्या उत्तररंगात सादर होणारा 'वग' ही त्या तोडीचा राहिला नाही. या संदर्भात श्री नामदेव व्हटकर म्हणतात, ''पण एक गोष्ट मनात भारी सलती. आजकाल तमाशाच्या बोर्डावर आपल्या मुळ मऱ्हाटी ढंगाचा आणि टिकाऊ तोलामोलाचा वग कुठं दिसना. सारा आपला पोकळ अन् तेच झकास म्हणून आपणच हसायचं. असं कराय लागल्यात. हे काय बरं नव्हं, आमची मऱ्हाटी मायमाऊले एखादा खरा उमाबाबू, पठ्ठेबापूराव कवा येईल म्हणून वाट बघत्यात खरंच कवा येईल हो?'' जो वग पूर्वी सादर केला जायचा त्या पद्धतीचा वग आज सादर होताना दिसून येत नाही. त्यात कृत्रिमता मोठ्या प्रमाणावर दिसून येते. त्यात निर्माण होणारा विनोद हा हल्ली अश्लिलतेकडे झुकताना दिसून येतो.

तमाशामध्ये काळानुरुप असे अनेक बदल तर होत आहेतच मात्र त्यासोबतच काही आव्हाने या लोककलेसमोर आज निर्माण झालेली दिसून येतात. तमाशाला आज लोकाश्रय राहिलेला दिसत नाही. त्यामुळे तमाशाला स्वतःच्या पायावर उभे राहण्याची वेळ आली आहे. त्यातल्या त्यात मनोरंजनाची साधने बदलली आहेत. वातानुकुलित चित्रपटगृहे, इंटरनेट, मोबाईल, खेड्यापाड्यापर्यंत पोहचलेले केबल, विविध चॅनेल्स, त्यावरील विविध कार्यक्रम, मालिका, नाट्यगृहे यासारखी मनोरंजनाची आधुनिक साधने उपलब्ध झाल्यामुळे प्रेक्षकांनी तमाशाकडे पाठ फिरवल्याचे दिसून येते. प्रेक्षकांच्या वाढत्या अपेक्षांची पूर्तता करण्यासाठी तमाशा मंडळाचा पसारा वाढतो आहे. त्यातून खर्च आणि उत्पन्न याचेही गणित ढासळताना दिसते आहे. तमाशाचे विशाल तंबू, रोषणाई, कलाकारांचा खर्च, प्रवास, वाहने, जाहिरात यावर होणारा खर्च आणि तुलनेत मोजका तिकिट दर यांचा मेळ बसवणे कठीण बनते आहे. चित्रपटगृहात पाचशे रुपयांचे तिकिट घेणारा प्रेक्षक तमाशाच्या पन्नास साठ रुपयांच्या तिकिटाला किती महाग म्हणून नाक मुरडतो. त्यामुळे तिकिट दर आटोक्यात ठेवावा लागतो. अशा आर्थिक विवंचनेचा सामनाही आज या मंडळांना करावा लागतो. अनेकदा उद्धट प्रेक्षकांकडून होणारी तोडफोड, नासधुस अशा बाबीही आव्हानांमध्ये भर घालताना दिसून येतात.

तमाशा मंडळाच्या अंतर्गतही काही आव्हाने समोर येताना दिसतात. त्यात तमासगिरांच्या अंगी दुरदृष्टीचा अभाव दिसून येतो. दुरदृष्टीच्या अभावामुळे आणि अज्ञान, दारिद्र्य व व्यसनी वृत्तीतून निर्माण झालेल्या दुर्गुणामुळे तमाशा सादरीकरणावर विपरीत परिणाम झाल्याचे दिसून येते. तसेच तमाशाविषयी असलेला पूर्वगृह दूर करण्याचे


ISSN No. 2319-6025

# तमाशा : बदलते स्वरूप आणि आव्हाने

**डॉ. शिवराज काचे**
राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर

**प्रस्तावना :**

सुरूवातीच्या काळात लोकाश्रयावर तग धरून राहिलेला 'तमाशा' या लोककलाप्रकाराला पेशवाईच्या काळात राजाश्रय मिळाला व नंतर हा प्रकार बहरास आल्याचे दिसून येते. उघड्यावर सादर होणाऱ्या तमाशाने मराठी मने रिझवली. त्यात असलेला विनोद, त्यातील संगीत आणि 'लावणी'ने तर महाराष्ट्राची ओळखच निर्माण झाली. महाराष्ट्रातील कष्टकरी, शेतकरी, मध्यमवर्ग एवढेच नाही तर उच्चभ्रू वर्ग या सर्वांनाच तमाशाने भुरळ घातल्याचे दिसून येते. महाराष्ट्रातील जनसमुहाने एकेकाळी 'तमाशा' या लोककलेला डोक्यावर घेतले. सुरूवातीच्या काळातील पठ्ठे बापूराव, विठाबाई मांग, काळू बाळू यासारख्या प्रसिद्ध कलावंताची आणि तमाशाची परंपरा आजही चंद्रकांत ढवळपुरीकर, रघुवीर खेडकर, मंगला बनसोडे, वनिता राणी कराडकर, रवीभाऊ धुळेकर यांनी 'तमाशा' कलाप्रकार टिकवून ठेवला आहे. मात्र त्यात मोठ्या प्रमाणात बदल झाल्याचे जाणवते.

पूर्वी एखाद्या झाडाखाली, ओट्यावर अथवा चार पडद्याच्या आत मशाली किंवा गॅस बत्त्याच्या मिनमिनत्या उजेडात सादर होणारा तमाशा आज रंगमंदिरात (थिएटर्स) आकर्षक व विशाल तंबूमध्ये, विद्युत रोषणाईत, रंगीबेरंगी दिव्यांच्या झगमगाटात प्रेक्षकांसमोर सादर होतो. यामुळे 'तमाशा' सादरीकरणात अनेक बदल झालेले आहेत. एवढेच नाही तर ढोलकी, तुणतुणे, घुंगरू, पेटी या पारंपरिक वाद्यांबरोबरच आज पियानो, ड्रम, विजेवरील आधुनिक वाद्ये, साऊंड सिस्टीम याची भर पडलेली आहे. पूर्वी लावणी हा प्रकार प्रेक्षक डोक्यावर घेत. लावणी सादर करणारी 'नाची' च्या अदाकरीनेच लावणी सादर करीत असे. तमाशातील नाचीच्या नृत्याचे स्वरूप स्पष्ट करताना डॉ. प्रभाकर मांडे म्हणतात, ''तमाशातील नाचीच्या नृत्याचे वैशिष्ट्य हे की, हे नृत्य कमालीचे कामोत्तेजक असते. नजरेचा तिरपा कटाक्ष, मादक नजर आणि डोळा मारणे, भृकटी उंचावणे असे डोळ्यांचे अनेक विभ्रम त्यात असतात. त्याशिवाय नितंब व उजोर यांच्या उत्तान हालचाली यामुळे हे नृत्य कामभावना चाळणारे ठरते. लावणी शृंगारीक असेल आणि ती म्हणताना नाचीचे उत्तान हावभावांनी व अंगविक्षेपांनी भरलेले नृत्य असेल तर तमाशा या रंगभूमीवरून शृंगाराची लयलूट न झाली तरच नवल. पदर शिडाप्रमाणे उंचावून पाठमोरे नितंब उडवीत चालणे-नाचणे हे तर तमाशाचे खास वैशिष्ट्यच म्हणावे लागेल. या सर्व विशेषांमुळे तमाशाच्या रंगभूमीवरील नाचाचे किंवा नाचीचे नृत्य त्यांच्या निराळेपणाने विशेष उठून दिसते.'' पण हे विशेष सध्याच्या तमाशातून पहायला मिळत नाही. सध्याच्या तमाशातील 'नाची', 'नऊ'वारीतून सहावारीत आली, डोक्यावरचा पदर खांद्यावर आला, नव्हे पदरच गायब

| | | |
|---|---|---|
| लोकनृत्योतून लोकसंस्कृआतीचा आविस्कार | डॉ. बाळासाहेब संतू चव्हाण | ५७ |
| आदिवासी जमातीच्या लोककलांचा सांस्कृतिक दृष्टीने अभ्यास | डॉ. डी. जे. दमामे | ६० |
| लोकसाहित्य व ललितसाहित्य यांचा अनुबंध | संतोषकुमार बाळकृष्ण डफळापूरकर | ६३ |
| लोककथेतील प्रयोगशील परिवर्तन | डॉ. युवराज देवाळे | ६५ |
| लोकसाहित्याची मौखिक परंपरा – लोककथा | शीतल शिवाजी धुमाळ | ६९ |
| खानदेशातील मातृदेवता : कानबाई | डॉ. रेश्मा दिवेकर | ७१ |
| तौलनिक लोकसंस्कृती अभ्यास : नवे अभ्यासक्षेत्र | डॉ. तातोबा बदामे | ७४ |
| लोकसंस्कृती आणि प्रयोगरूप लोककलाविचार | डॉ. शहाजी ज. पाटील | ७७ |
| लोकसंस्कृती आणि साहित्य सहसंबंध | डॉ. प्रकाश दुकळे | ८२ |
| लोकजागृती मधील भारूडाचे महत्त्व | श्रध्दा ज्ञानेश्वर धुमाळ | ८६ |
| लोकसाहित्यातील लोककथा | डॉ. दीपक गायकवाड | ८९ |
| सोलापूर जिल्ह्यातील लोककला | डॉ. अरुण कृष्णा शिंदे | ९२ |
| भारूडातील शैलीविचार | प्रा. (डॉ.) रमेश पांडुरंग पोळ | ९६ |
| लोकसंस्कृतीच्या उपासकांच्या लोकगीतांचे योगदान | सुचिता सुभाष औंधकर | ९९ |
| 'गोंधळ'–एक विधिनाटय | डॉ.कांचन विजय नलावडे | १०२ |
| शाहूवाडी तालुक्यातील जाखडीफ लोकलेचे स्वरूप व परंपरा | प्रकाश नाईक | १०४ |
| तमाशा : बदलते स्वरूप आणि आव्हाने | डॉ. शिवराज काचे | १०७ |



ISSN No. 2319-6025

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विद्वत्प्रमाणित त्रैमासिक

# शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Referred Research Journal) ISSN No. 2319-6025
(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली मान्यता अ. क्र. ६४१७५)
वर्ष दहावे : अंक पंचवीस - सव्वीसावा
जानेवारी-फेब्रुवारी-मार्च, एप्रिल-मे-जून २०२१

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार" -
शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित
पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगाव
• Accredited B++ with CGPA 2.76 by NAAC • ISO मानांकन 9001:2015 •
ता. तासगाव, जि. सांगली



# लोकसंस्कृतीची आविष्कार रूपे